जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - १०३७ दिनांक २९/०६/२०२०**

## चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन पुणे

## चतु:श्रृंगी पोलीसांनी ऑनलाईन हायप्रोफाईल वेश्या व्यवसाय चालवणा-या टोळीचा केला पर्दाफाश

दिनांक २३/०६/२०२० रोजी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन हद्दितील रो हाऊस नं १,अर्बन क्रेस्टचे बाजुला, पाषाण टेकडीलगत, धनकुडे वस्ती, बाणेर पुणे या ठिकाणी ओयो हॉटेल येथे अवैद्य वेश्या व्यवसाय चालक व मालक यांचेवर पोलीसांनी छापा टाकून कारवाई केली होती.सदर प्रकरणाचा मा.पोलीस उप आयुक्त सो,पंकज देशमुख परिमंडळ ४ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास करीत असताना सदरचे हाई प्रोफाईल सेक्स रॅकेट हे ऑनलाईन वेबसाईटच्या माध्यमातून चालवण्यात येत असून त्यामध्ये इतर हाय प्रोफाईल लोकांचा सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल शेवाळे,पोलीस उप निरीक्षक मोहन जाधव व तपासपथक यांनी बाणेर बालेवाडी व मुंबई याठिकाणाहून आरोपी नामे रविकांत बालेश्ध्वर पासवान वय ३४ वर्षे रा. फ्लॅटनं. ३०५ एस-३ प्राईम सोसायटी सुसगाव पुणे मुळगाव-पासवान हौऊस, भोलेनाथ मंदिराचे समोर, ब्लॉक मुसाहरी ता. रमना जि. मुजफ्भपुर बिहारराज्य व दिपक जयप्रकाश शर्मा वय ३६ वर्षे रा. फ्लॅट नं.२ अंबर अपार्टमेंट, साई चौक, बालेवाडी पुणे मुळगाव प्रकाश भवन, बगाली पारा, इनकम टॅक्स, ऑफिस जवळ, जारसुगुडा ओरिसा यांना ताब्यात घेवून तपास केला असता सदरचे सेक्स रॅकेट हे स्विट सर्व्हिसेस एस्कॉर्ट या वेबसाईट व्दारे चालविले जात असून एस्कॉर्ट सर्व्हिसेस बुकींग करिता वापरण्यात आलेले ११ मोबाईल फोन,०४ लॅपटॉप व ०१ ॲपल आयपॅड तसेच वेश्या व्यवसाय वाहतुक करता वापरण्यात आलेली टाटा सफारी कार गुन्हयात जप्त करण्यात आली आहे.

सदरचे गुन्हयातील मुख्य आरोपी नामे रविंकांत पासवान हा बँक ऑफ बडोदा,मुरूम जि.पुणे येथे असिस्टंट बँके मॅनेजर या पदावर असून दुसरा आरोपी दिपक जयप्रकाश शर्मा हा उच्चशिक्षित सॉप्टवेअर इंजिनिअर आहे.सदरचा गुन्हयाची व्याप्ती मोठी असून सदरचा सर्व प्रकार हा ओयो हॉटेल रो हाऊस नं १,अर्बन क्रेस्टचे बाजुला,पाषाण टेकडी लगत, धनकुडे वस्ती, बाणेर पुणे येथे सुरू होता.आत्तापर्यंत चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन गु.र.नं. ९५४/२०२० अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ मध्ये आरोपी नामे १) मॅनेजर सुरेश प्रल्हाद रणविर वय २५ वर्षे रा. रा. सध्या. ओयो होम, ४९९५३, ऑडी शोरुमचे विरुध्द बाजुस, मॉडर्न हॉस्टेलजवळ बाणेर पुणे, मुळगाव मु.उमरी, पो. भाटेगाव,ता.हातगाव, जि. नांदेड २) रो हाऊस मालक नाकसेन रामदास गजघाटे,वय ५२ वर्षे रा.ए-११,शगुन निसर्ग,बावधान पुणे.३) रविकांत बालेश्ध्वर पासवान वय ३४ वर्षे रा. फ्लॅटनं. ३०५ एस-३ प्राईम सोसायटी सुसगाव पुणे मुळगाव-पासवान हौऊस, भोलेनाथ मंदिराचे समोर, ब्लॉक मुसाहरी ता. रमना जि. मुजफ्भपुर बिहारराज्य ४) दिपक जयप्रकाश शर्मा वय ३६ वर्षे रा. फ्लॅट नं.२ अंबर अपार्टमेंट, साई चौक, बालेवाडी पुणे मुळगाव प्रकाश भवन, बगाली पारा, इनकम टॅक्स, ऑफिस जवळ, जारसुगुडा ओरिसा यांना अटक करण्यात आली आहे.तसेच महिला नामे शिवानी पाटील ऊर्फ जोया रेहान खान रा.भोपाळ -मध्यप्रदेश ही फरार असून तिचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई ही मा. सुनिल फुलारी, अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर व मा. पंकज देशमुख, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ पुणे शहर, मा.सहायक पोलीस आयुक्त, लक्ष्मण बोराटे, खडकी विभाग, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.दाखल गुन्हयाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अनिल शेवाळे हे करीत आहेत.